# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय
दि. 21/01/2022

**मा. महासभा दि. 25/01/2022**

**पुरक घोषणा**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीम. ——————————
नगरसेवक/नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण 2 नियम 1 (ज) अन्वये दिनांक 25/01/2022 रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र. क्र. | विषय |
|---|---|
| 103 | सन्मा. सदस्य श्री. अनिल दिवाकर सावंत यांचा दिनांक 19/01/2022 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>————————<br>मिरारोड शांती नगर व शांती पार्क गृहसंकुलाच्या रेखांकनातील मोकळ्या जागा (R.G.) जागा देखभाल दुरुस्ती करणेकरीता विकासका बरोबर झालेला करारनामा मनपाने रद्द करुन जागा पुन्हा विकासकाच्या ताब्यात दिलेबाबत आक्षेप. |
| 104 | सन्मा. सदस्या श्रीम. निला सोन्स यांचा दिनांक 20/01/2022 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>————————<br>सोसायटीचे नळ कनेक्शन खंडीत न करणे बाबत. |
| 105 | सन्मा. सदस्या श्रीम. निला सोन्स यांचा दिनांक 20/01/2022 रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>————————<br>रस्ता व चौकांचे नामकरणाचा प्रलंबित प्रस्ताव पारित करणे बाबत. |

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# अनिल दि. सावंत

## अध्यक्ष-मिरा भाईंदर (शहर) जिल्हा कॉंग्रेस कमिटी

## नगरसेवक मिरा भाईंदर महानगरपालिका

INDIAN NATIONAL CONGRESS

कार्यालय : १, अस्मिता एस्कोन एक्र्स, नया नगर, मिरा रोड ( पू ), ठाणे - ४०११०७
पत्रव्यवहार पत्ता : बी-५२, पूनरवसु, सृष्टी कॉम्पलेक्स, सेक्ट.-३, मिरा रोड ( पू ), ठाणे - ४०११०७
मो. : 9594996295, E-mail : sawant07meera@gmail.com


प्रकरण क्र. १०३ करिता

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.प./ल.प./जन(पु.प्रो.)
आवक क्र. ०२/-०९ ..........
दिनांक:- १८/ १ /2022
वेळ- दु. १.४० वा.

मा.नगरसचिव
मीरा भाईदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय भाइंदर-पश्चिम,
ठाणे-४०११०१.

दिनांक: १९.१.२०२२

विषय:-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम(सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ ज अन्वये मा.महासभा दि.२५.१.२०२२ मध्ये प्रस्ताव घेणेबाबत.

संदर्भ:-मीरा रोड शांती नगर व शांती पार्क गृहसंकुला च्या रेखांकानतील मोकळ्या जागा (R.G.) जागा देखभाल दुरुस्ती करणे करिता विकासका बरोबर झालेला करार नामा मनपाने रद्द करून जागा पुन्हा विकसकासकच्या ताब्यात दिलेबाबत आक्षेप.

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणास विनीत करण्यात येते कि संदर्भीय विषय चर्चा करणेसाठी व निर्णयासाठी मा.महासभा दि.२५.१.२०२२ मध्ये घेण्यात यावा.

मीरा रोड पूर्व-शांती नगर व शांती पार्क गृहसंकुला च्या रेखांकानतील मोकळ्या जागा (R.G.) विकासकाने विकसित करणे अभिप्रेत होते परंतु विकासकाने तसे न केल्यामुळे या जागांचा गेर वापर व अनधिकृत कारणांसाठी वापर झाल्याचे राज्य शासनाच्या निदर्शनास आले.म्हुणुन राज्य शासनाने दि.१०.६.९६ रोजी परिपत्रक क्र.TPB/४३९६/११४/प्र.क्र.८९/९६ / नवी/११ व परिपत्रक दि.३०.६.२०१० रोजी शासन परीपत्रक क्र.संकीर्ण/२००९/९५५/प्र.क्र.१४६/नवि/२० परिपत्रक काढून सदर मोकळ्या जागा त्याब्यात घेऊन त्यांची देखभाल दुरुस्ती करण्याचे निर्देश स्थानिक स्वराज्य संस्थाना दिलेले आहेत.त्या नुसार मनपाने सदर जागा ताब्यात घेऊन विकसित केल्या व त्यांची देखभाल दुरुस्ती केलेली आहे.

---२

# अनिल दि.सावंत

## अध्यक्ष-मिरा भाईंदर (शहर) जिल्हा काँग्रेस कमिटी

## नगरसेवक मिरा भाईंदर महानगरपालिका

INDIAN NATIONAL CONGRESS





कार्यालय : १, अस्मिता एस्कोन एक्र्स, नया नगर, मिरा रोड ( पू ), ठाणे - ४०११०७

पत्रव्यवहार पत्ता : बी-५२, पूनरवसु, सृष्टी कॉम्पलेक्स, सेक्ट.-३, मिरा रोड ( पू ), ठाणे - ४०११०७

मो. : 9594996295, E-mail : sawant07meera@gmail.com


मीरा रोड शांती नगर व शांती पार्क गृहसंकुला च्या रेखांकानतील मोकळ्या (R.G.) जागांवर मनपातर्फे समाज मंदिर,उद्याने विकसित करणे,झाडे लावणे,सुलभ शौचालय बांधणे, प्रवेशद्वार बांधणे,क्रिकेट व्हॉलिबोल,फुट बॉल व इतर खेळांकरिता सोई सुविधा उपलब्ध करणे,जॉगिंग ट्रॅक बनविणे,पंप हाउस बांधणे,हाय मास्ट व इतर दिव्यांची सोय करणे,कुंपण भिंत बांधणे,स्टेज बांधणे ई. या साठी करोडो रुपयाचा खर्च सन २००७ पासून मनपाने केलेला आहे. सदर कामांसाठी नगर सेवक निधी,आमदार निधी,खासदार निधी,पदाधिकारी निधी तसेच शासनाचा निधी खर्च झालेला आहे.याचा या संकुलातील नागरिकांना एवढी वर्षे मोठा फायदा होत होता. यासाठी साधारण ५० कोटी पेक्षा जास्त रकमेचा खर्च झालेला आहे.या सर्व मोकळ्या जागा गेली १५ वर्षे मनपाच्या ताब्यात आहेत.

दि.१८.११.२०२१ मध्ये मनपा प्रशासनाने अधिका-यांच्या झालेल्या मिटींग मध्ये निर्णय घेऊन शहरातील २५ R.G. उद्यानातील मुलभूत सोयीसुविधा पुरविणे बंद केले व या उद्यानांचा ताबा विकासकाला देऊन टाकला. या मध्ये प्रामुख्याने शांती नगर व शांती पार्क गृहसंकुला च्या रेखांकानतील मोकळ्या (R.G.) जागांचा समावेश आहे. यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागा कडील दि.२.१२.२०२० UDCPR ३.४.२.(ii) निर्णयातील तरतूदींचा हवाला देण्यात आला. परंतु निर्णयातील तरतुदी नुसार सदर जागांवर पूर्ण अधिकार गृह संकुलातील राहिवासियांचाच आहे.यातील तरतुदीनुसार जर मनपाने R.G. च्या जागेची देखभाल दुरुस्ती केल्यास त्यावर होणारा खर्च संबंधित मालक/गृह निर्माण सो./भोगवटा धारक यांच्या कडून वसूल करायचा आहे,असे म्हटलेले आहे. परंतु मनपाने खर्च झालेली रक्कम विकासकाकडून वसूल करणे संबंधी कोणतीही कारवाई केलेली नाही. उलटपक्षी करार नाम्यान्वये महापालिकेच्या ताब्यात असलेल्या शांती नगर व शांती पार्क गृहसंकुला च्या रेखांकानतील मोकळ्या (R.G.) जागां करार नामा रद्द करून विकासकालाच देऊन टाकल्या. करार नामा रद्द करतेवेळी त्या रेखांकनातील भोगवटा प्राप्त गृह निर्माण संस्थाना विचारात घेतलेले नाही.

शांतीनगर वसाहतील जनतेचे हित लक्षात घेऊन सदर विषय मा.महासभा दि.२५.१०.२०२१ रोजी चर्चेसाठी व निर्णयासाठी घेण्यात यावा हि. विनंती.

आपला

(अनिल दि.सावंत)

# नीला सोन्स

नगरसेविका – मिरा भाईंदर महानगरपालिका
स्थायी समिती सदस्या
आरोग्य परिरक्षण समिती सदस्या
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी – महाराष्ट्र शासन (S.E.O.)

# विजय राय

नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
वृक्षप्राधिकरण समिती सदस्य
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)

संपर्क : निओ ग्रुप, सेवेल इलेवन रेसिडेंसी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०७.
मोबाईल : 9892718100• ई-मेल : neelasoans100@gmail.com

संपर्क : सी/४०२, शांति आशीष, शिवार गार्डन के सामने, मिरारोड (पूर्व), ता. जि. थाने - ४०१ १०७
मोबाईल : 9892451108 Email : bjpvijayrai@gmail.com


जावक क्र.____________

दिनांक 20/1/2022

**दि. २५-०१-२०२२ रोजी मा. माहासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणे बाबत.**
**प्रकरण क्र.** ..१०४..

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
क्र.मन.पा./न.स./...
आवक क्र....3/2...........
दिनांक:- 20/ 7 /2022

**प्रति,**
**मा. नगरसचिव सो.,**
मिरा-भाईंदर भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- सोसायटींचे नळ कनेक्शन खंडीत न करणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, मालमत्ता कर वसुली करीता मालमत्ता कर थकित असलेल्या सोसायटींचे नळ कनेक्शन खंडीत करणे बाबतची कार्यवाही प्रशासनामार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

कोरोना काळात नागरीकांची आर्थिक परिस्थितीत तंग झालेली असुन मोठया प्रमाणात नागरीकांच्या नोकऱ्या देखील गेलेल्या आहेत. यामुळे काही नागरीकांचे मालमत्ता कर देयके काही प्रमाणात भरण्याची राहून गेलेली आहेत. अशा परिस्थितीत महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर थकबाकी असलेल्या सोसायटयांना दिलासा देण्याकरीता नळ कनेक्शन खंडीत न करता यावर विचार विनिमय करून निर्णय घेण्याकरीता मा. महासभेमध्ये प्रस्ताव परित करणेकरीता "ज" खाली प्रस्ताव मांडत आहे.

आपले विश्वासू,

Neelasoans

**निला सोन्स**
नगरसेविका
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विजय राय**
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका

# नीला सोन्स

नगरसेविका – मिरा भाईंदर महानगरपालिका
स्थायी समिती सदस्या
आरोग्य परिरक्षण समिती सदस्या
ठाणे जिल्हा नियोजन समिती सदस्या
विशेष कार्यकारी अधिकारी – महाराष्ट्र शासन (S.E.O.)

# विजय राय

नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
वृक्षप्राधिकरण समिती सदस्य
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन (S.E.O.)

संपर्क : निओ ग्रुप, सेवेल इलेवन रेसिडेंसी, लक्ष्मी पार्क, मिरारोड (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०७.
मोबाईल : 9892718100• ई-मेल : neelasoans100@gmail.com

संपर्क : सी/४०२, शांति आशीष, शिवार गार्डन के सामने, मिरारोड (पूर्व), ता. जि. थाने - ४०१ १०७
मोबाईल : 9892451108 Email : bjpvijayrai@gmail.com


जावक क्र.______________

दिनांक 20/1/2022

**दि. २५-०१-२०२२ रोजी मा. माहासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणे बाबत.**

**प्रकरण क्र. 905.**

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
[illegible]
आवक क्र. 8/3
दिनांक:- 20/ 9 /2022

**प्रति,**

**मा. नगरसचिव सो.,**

मिरा-भाईंदर भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- रस्ता व चौकांचे नामकरणचा प्रलंबित प्रस्ताव पारित करणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, यापूर्वीच्या मा. महासभेत मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ता व चौकांचे नामकरण करणे बाबतचा प्रस्ताव व त्याबदल धोरण ठरविण्याचा विषय मा. महासभेत चर्चा करून धोरण निश्चित केलेले आहे.

याबाबत मा. महासभेत प्रशासनामार्फत गोषवारा देवुन व धोरण निश्चित करून सुध्दा समाजाच्या भावनेशी निगडीत विषय मा. महासभेच्या विषय पटलावर का घेण्यात आलेला नाही याबद्दल मिरा-भाईंदर शहरातील जनतेस माहिती होणे करीता व नामकरण करण्यात येणाऱ्या महापुरुषांच्या सन्मानार्थ व आदरांजली अर्पण करण्यास प्राथमिकतेने मा. महासभेमध्ये प्रस्ताव परित करून त्वरीत नामकरण करणेकरीता "ज" खाली प्रस्ताव मांडत आहे.

आपले विश्वासू,

Neelosans

**निला सोन्स**
नगरसेविका
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विजय राय**
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका